CNR-MHNG100018162023

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३५/२०२३
सुधा – विरुध्द – सुधीर

## निशाणी क्र. ३–अ वर आदेश
## (पारित दिनांक १० फेब्रुवारी,२०२६)

अर्ज व त्यावरील सामनेवाला यांच्या खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज :**

२. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी खर्च मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाला. त्यानंतर ते दिड महीन्यापर्यंत दहेगाव येथे पती पत्नी म्हणुन एकत्र राहले. गैरअर्जदाराने अर्जदारास शारीरिक व मानसीक त्रास दिला. अर्जदारास दहेगाव येथे एकटे सोडुन निघुन गेलो. फोनवर अर्जदारास जिवे मारण्याची धमकी देत आहे. अर्जदाराचे पालन पोषनाची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. गैरअर्जदारास व्यवसायातुन सत्तर ते अंशी हजार रुपये उत्पन्न होते. त्याच्यावर कोणीही अवलंबुन नाही.

३. सबब त्यांनी अर्ज दाखल केला. अर्जदाराच्या पालनपोषणासाठी व घरभाडे मिळुन रु.२०,०००/– अंतरीम पोटगी म्हणून अर्जदाराला देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

**खुलासा :**

४. प्रस्तुतच्या अर्जावर गैरअर्जदार यांनी खुलासा दाखल केला. त्यांनी मुळ

अर्जातील व प्रस्तुतच्या अर्जातील सर्व कथन विवक्षीतपणे नाकारले. कौटुंबीक हिंसाचाराचे कथन साफपणे नाकारले. तसेच अर्ज कायदेशीर नाही. कारण अर्जदार यांनी न्यायालयापासुन माहीती लपविलेली आहे. गैरअर्जदाराला त्रास देण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे शास्तीसह खारीज करण्यात यावा. गैरअर्जदार कधीच अर्जदार हीच्या संबंधात नव्हता. गैरअर्जदार यांचे कुंटूंब आहे आणि तो त्यांच्यासह राहत आहे. त्यामुळे अर्जदाराचा व गैरअर्जदाराचा कुठलाही संबंध नाही.

५. अर्जदार हीचे पहीले लग्न भोंगाडे यांच्यासोबत झाले होते. अर्जदार हीने त्यांच्यापासुन घटस्फोट घेतला नाही. असे असतांना त्या सुमीर खैरे यांच्यासोबत राहत होत्या. तसेच सुमीर खैरे हे अर्जदाराला कंटाळुन त्यांनी आत्महत्या केली. त्यानंतर अर्जदार ही त्यांच्या मिळकतीची मालक झाली ती बाब अर्जदार हीने लपविली. अर्जदार ही तिच्या बहीणीचे पती पांडुरंग नाईक यांच्या प्रवाहात आहे. त्यांचे राजकीय प्रस्थ असुन त्यांचा पोलीसांवर देखील प्रभाव आहे. ते प्रस्तुतच्या अर्जातील पक्षकार यांच्यात ढवळाढवळ करतात. गैरअर्जदारांनी त्यांच्या म्हणण्याप्रामणे वागाव असा त्यांचा मनसुब आहे आणि म्हणुनच गैरअर्जदार याला अर्जदाराशी लग्न करण्यास भाग भाडले. सबब अर्ज खारीज करावा अशी त्यांनी विनंती केली.

६. खालील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहे काय ? | ...होय |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> :**

७. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर कौटुंबीक घटना अहवाल दाखल आहे. तसेच

अभिलेखावर अर्जदार यांनी काही दस्तऐवज दाखल केले आहे. त्यांनी स्वतःचे संपत्ती व दायित्वाचे प्रमाणपत्र दाखल केले. तसेच विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अर्जदाराचा आधार कार्ड, पोलीस स्टेशन समुद्रपुर यांच्याकडे दिलेली तक्रार, एन.सी. रिपोर्ट दि.०२.०८.२०२३ रोजीची, नोटीस गैरअर्जदार यांना दिलेली इ. दाखल आहे.

८. अर्जदार व गैरअर्जदार हे पती–पत्नी आहेत, असे अर्जावरुन व लेखी जबाबावरुन दिसून येते. कारण गैरअर्जदार यांनी लग्नाबाबत आक्षेप घेतला आहे. परंतु त्याच वेळी ते असे कथन करीत आहे की, त्यांचे जबरदस्तीने अर्जदारासोबत लग्न झाले. थोडक्यात त्यांचे लग्न झाले. त्यात दाखल दस्त दुजोरा देत आहे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल आहे. ते प्रमाणपत्र शिव वैदीक विवाह मंगल कार्यालय यांचे संचालक यांनी दिल्याचे दिसते. दि.२०.०४.२०२२ रोजी विवाह झाला असे त्यामधे नमुद आहे. गैरअर्जदार यांचे नाव देखील आहे व पत्ता देखील जो अर्जात लिहीला आहे तोच आहे. गैरअर्जदार याने ते पती पत्नी नाहीत असा आक्षेप घेतलेला आहे आणि त्यांना दोन मुल आहेत. हे त्यांच्या शपथपत्रात नमुद आहे.

९. अर्जदार यांनी अर्जामध्ये तिला काय त्रास दिला, याबाबत कथन केले आहे. अर्जदार यांनी नि.क्र.१४ अन्वये संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी नि.क्र.१५ अन्वये संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे.

१०. अर्जदार यांनी त्यांच्या नि.क्र.१४ च्या शपथपत्रात, गैरअर्जदार हे दरमहा ७०,०००/– ते ८०,०००/– रुपये कमावतात असे नमुद केले आहे. अर्जात व गैरअर्जदार यांच्या खुलाशात जी तथ्ये नमुद केली आहेत, ती परस्पर विसंगत आहे. त्यास पुराव्याची आवश्यकता आहे. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराबाबत जे गंभीर कथन केले आहे. त्यास देखील पुराव्याची आवश्यकता आहे व तो एक गुणवत्तेचे व संवेदनशील तथ्य आहे. त्यामुळे त्याचे

विवेचन मी करीत नाही. उभयतांना नातेसंबंध कबुल आहे. गैरअर्जदार यांनी त्यांचे जे नि.क्र.१५ अन्वये शपथपत्र दाखल केले आहे. त्यात मासीक उत्पन्न २०,०००/- नमुद केले आहे. त्यांच्यावर चार लाख रुपयाचे हात उसणवार कर्ज आहे ते देखील त्यांनी नमुद केले आहे.

**११.** गैरअर्जदार यांनी कबुल केल्यावरुन अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी आहे. अर्जदाराचे पालनपोषण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदारची आहे. गैरअर्जदार याने अर्जदार माहेरी राहते, तेव्हापासून तीला कोणतीही आर्थिक मदत केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

**१२.** अर्जातील परिस्थिती व गैरअर्जदार याचे उत्पन्नाचा विचार करता, माझे मते अर्जदार हिस दरमहा रुपये ४,०००/- (अक्षरी चार हजार रुपये मात्र) अंतरिम पोटगी दाखल तारखे पासुन ते अर्ज निकाली लागेपर्यंत मंजुर करणे, न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे. मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

- अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.
- गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस दरमहा रुपये ४,०००/- (अक्षरी चार हजार मात्र) इतकी अंतरिम पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ अर्जाचा अंतिम आदेश होई पावेतो अदा करण्याचे आदेशित करण्यात येते.
- प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

Sd/-

**उमरेड.** **( रा.भा. डोळे )**

**दिनांक : १०.०२.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड.**